आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२१ एप्रिल २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तामिळनाडूतल्या सर्व, तर पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्यासाठीच्या विधानसभा मतदारसंघांमधल्या निवडणुकांचा प्रचार संपला

- अमेरिकेच्या धमक्यांच्या आडून होणाऱ्या वाटाघाटी मान्य नसल्याची इराणची भूमिका, शस्त्रसंधीबाबतच्या चर्चेवर अनिश्चिततेचं सावट कायम

- अर्थव्यवस्थेच्या आकाराच्या बाबतीत महाराष्ट्राची स्पर्धा आता जागतिक स्तरावर असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७५३ अंकांची वाढ

**आणि**

- केरळमधे फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात १३ कामगारांचा मृत्यू, अनेकजण गंभीर जखमी

**<><><><><>**

तामिळनाडू विधानसभा निवडणुका आणि पश्चिम बंगालमधल्या पहिल्या टप्प्यासाठीचा प्रचार आज संध्याकाळी संपला. येत्या गुरुवारी, २३ तारखेला तामिळनाडूत एकाच टप्प्यात, तर पश्चिम बंगालामध्ये पहिल्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे.

पश्चिम बंगालमध्ये आज प्रचाराच्या शेवटच्या दिवशी भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बर्धमान जिल्ह्यात कुल्टी आणि सिलीगुडी इथं सभा घेतल्या. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही हल्दिया इथं जाहीर सभा घेतली. काँग्रेस, आमि डाव्या पक्षांनीही राज्यात आपापल्या उमेदवारांसाठी  प्रचार केला.

तामिळनाडूत केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी प्रचार केला. AIADMK पक्षाचे महासचिव एडापल्ली पल्लानीस्वामी यांनी सालेम इथं सभा घेतली. तर टीव्हीके पक्षाचे संस्थापक, अभिनेते विजय यांनी चेन्नई इथं प्रचार केला.

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठीचा प्रचारही आज संपला. बारामती पोटनिवडणुकीत सर्व पक्षांनी दिलेला पाठिंब्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी आज प्रचाराच्या सांगता सभेत आभार मानले. बारामतीच्या सर्व मतदारांनी मतदान करून अजित पवार यांच्या स्मृतींना आदरांजली वाहावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी केलं. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांना आपल्या पक्षाने दिलेला पाठिंबा ही अजित पवार यांना श्रद्धांजली असल्याचं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, राहुरीमध्ये भाजपाचे अक्षय कर्डिले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह एकूण ७ उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेच्या धमक्यांच्या आडून होणाऱ्या वाटाघाटी मान्य नसल्याचं इराणच्या शिष्टमंडळाचे प्रमुख मोहम्मद बाघेर गलिबाफ यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. त्यामुळे इराण आणि अमेरिकेत होणाऱ्या शस्त्रसंधीबाबतच्या चर्चेवर अनिश्चिततेचं सावट आहे. आतापर्यंत तेहरानच्या कोणत्याही शिष्टमंडळाने पाकिस्तानला भेट दिलेली नसल्याचं इराणच्या सरकारी वाहिनीने स्पष्ट केलं आहे. इराणबरोबरचा संघर्ष संपवण्याची आपल्याला घाई नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यासाठी युद्धबंदी झाल्यावरही पश्चिम आशियात युद्धाचा तणाव कायम आहे. इस्त्रायलने दक्षिण

लेबननमधल्या काही ठिकाणांवर हल्ला केला असून केवळ दहशतवादी तळांनाच लक्ष्य केल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. गाझामधे ओलिस असलेल्या सर्व इस्त्रायली नागरिकांना परत आणलं गेलं असून पुन्हा युद्ध सुरू झालं तर इस्त्रायल सज्ज आहे, असं प्रधानमंत्री बेंजामीन नेतन्याहू यांनी म्हटलं आहे.

दुसरीकडे इराणने शस्त्रसंधीचं अनेकदा उल्लंघन केल्याचा आरोप अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. अमेरिकेने इराणचं एक मालवाहू ू जहाज ताब्यात घेतलं आहे.

**<><><><>**

संरक्षण मंत्रालयाने आज T-72 आणि T-90 श्रेणीतल्या रणगाड्यांसाठी, अंदाजे ९७५ कोटी रुपये खर्चाची ‘ट्रॉल असेम्ब्ली’ खरेदी करण्यासाठीच्या करारांवर स्वाक्षरी केली. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत, आज नवी दिल्ली इथं भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड आणि इलेक्ट्रो न्यूमॅटिक्स अँड हायड्रोलिक्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड यांच्याबरोबर या करारांवर स्वाक्षरी करण्यात आली.

T-72 आणि T-90 रणगाड्यांसाठी ‘ट्रॉल असेम्ब्ली’ हे अत्यंत महत्वाचं उपकरण असून, ते भारतीय लष्कराची सुरुंगक्षेत्र भेदण्याची क्षमता वाढवेल. तसंच रणगाडाविरोधी सुरुंगांनी भरलेल्या क्षेत्रातून वाहनांसाठी सुरक्षित मार्ग तयार करण्याची अतिरिक्त क्षमता प्रदान करेल, असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><>**

अर्थव्यवस्थेच्या आकाराचा विचार करता महाराष्ट्राची स्पर्धा आता देशातल्या अन्य राज्यांशी नसून जागतिक स्तरावर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. नागरी सेवा दिनानिमित्त आज मुंबईत आयोजित कार्यक्रम झाला. त्यावेळी ते बोलत होते.

महाराष्ट्र आता जगातली तिसावी मोठी अर्थव्यवस्था असल्याचं त्यांनी सांगितलं. अर्थव्यवस्थेच्या विकासाची हीच गती कायम राखली तर आपण पुढच्या दोन ते तीन वर्षामध्ये यूएई आणि सिंगापूरला देखील अर्थव्यवस्थेच्या आकारात मागे टाकू शकतो, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**- - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेची पारितोषिकं प्रदान करण्यात आली.

देशभरात आज नागरी सेवा दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दिवसानिमित्त सर्व सनदी अधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराणमध्ये चर्चा पुन्हा सुरू होण्याच्या शक्यतेनं देशातले शेअर बाजार आज दीड महिन्यातल्या उच्चांकी पातळीवर बंद झाले. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७५३ अंकांची वाढ नोंदवून ७९ हजार २७३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २१२ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार ५७७ अंकांवर स्थिरावला. सुरुवातीला किरकोळ वधारलेले हे दोन्ही निर्देशांक संपूर्ण सत्रात टप्प्याटप्प्याने वधारत गेले. तेलाच्या कमी झालेल्या किंमतीचाही फायदा शेअर बाजारांना झाला.

**<><><><><>**

केरळच्या त्रिसुर जिल्ह्यात मुंडाथिकोड इथं फटाक्यांच्या कारखान्यात आज दुपारी साडेतीनच्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात १३ कामगार ठार झाले तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत. हा स्फोट झाला तेव्हा कारखान्यात ४० कामगार उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबाला प्रधानमंत्री राष्ट्रीय मदतनिधीमधून दोन लाख

रुपयांची तर जखमींना ५० हजारांची आर्थिक मदत जाहीर केली. मुख्यमंत्री पी विजयन यांनी दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून गंभीर जखमींवर योग्य ते उपचार करावेत, अशा सूचना डॉक्टरांना दिल्या आहेत.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात कोणसई गावातल्या फटाके बनवणाऱ्या कंपनीत आज दुपारी बाराच्या सुमारास स्फोट झाला. या स्फोटात दोन कामगारांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले. जखमींवर वाडा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय हितासाठी सर्व राजकीय पक्षांनी महिला आरक्षण विधेयकाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकाला पाठिंबा द्यायला हवा होता, मात्र विरोधी पक्षांनी राष्ट्रीय हितापेक्षा पक्षीय राजकारणाला प्राधान्य दिल्यानं हे विधेयक मंजूर होऊ शकलं नाही, अशी टीका केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. या विधेयकाला विरोध केल्यामुळे विरोधी पक्षांना भविष्यात गंभीर परिणामांना सामोरं जावं लागू शकतं, असंही वीरेंद्र कुमार यावेळी म्हणाले....

**होल्ड.. बाईट - वीरेंद्र कुमार**

**<><><><><>**

नवीन आयकर कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी आयकर विभागानं आज नवी मुंबईत विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. मुख्य आयकर आयुक्त विक्रम सहाय यांनी यावेळी नवीन आयकर कायद्याविषयी मार्गदर्शन केलं आणि उपस्थितांच्या शंकांचं निरसन केलं.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं आज लातूर इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. डॉ. गोपाळराव पाटील यांनी

वैद्यकीय सेवेतून समाजकारणात प्रवेश करून राजकारणात सक्रीय भूमिका बजावली. १९९४ ते २००० या काळात भाजपाचे राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी काम केलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथल्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम  क्षेत्ररक्षण  करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैदराबादच्या ९व्या षटकात १ बाद ९७ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**